ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.519

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

Oct-Nov-Dec 2024
Vol. 13 No. 4

# केशवराव जेधे यांचे राजकीय विचार व कार्य

**वर्षा प्रकाश आसबे**

*संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग,*

*शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.*

*Corresponding Author:* *वर्षा प्रकाश आसबे*

**DOI - 10.5281/zenodo.14681982**

**प्रस्तावना:**

छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास पाहता महाराजांकडे असलेल्या अनेक सरदारांची कामगिरी गौरवशाली आहे. छत्रपतींच्या आज्ञा प्रमाण मानून प्रत्येक सरदार, मावळे स्वराज्यासाठी आपले योगदान देत होते. आपल्या वतनाचा विचार न करता महाराजांचा आदेश प्रमाण मानणारे त्यापैकी एक सरदार म्हणजे कान्होजी जेधे होय. कान्होजी जेधे यांनी निस्पृहपणे आपले कर्तव्य करणे हाच धर्म मानून स्वराज्यासाठी आपले योगदान दिले. कान्होजी जेधे यांच्या कार्यकर्तृत्वाचा वारसा पुढे चालवण्याचे काम त्यांचे वंशज केशवराव जेधे यांनी केले. त्यांचे कार्यही अत्यंत महत्त्वाचे व गौरवशाली दिसून येते.

केशवराव जेधे यांच्या कार्याची सुरुवात सामाजिक सुधारणेपासून झाली. केशवराव जेधेंवर त्यांचे थोरले बंधू बाबासाहेब जेधे व महात्मा गांधीजींच्या विचारांचा प्रभाव पडला होता. त्यातूनच केशवराव जेधे यांची जडणघडण झाली. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राजकारणात जेधे यांचा सक्रिय सहभाग होता. भारतीय संविधान निर्मितीसाठी निर्माण झालेल्या संविधान सभेमध्ये सदस्य म्हणून केशवराव जेधे यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले. तर १९५७ साली जेधे बारामती लोकसभा मतदारसंघांमधून निवडून आले. जेधेंच्या राजकीय कार्याची सुरुवात अखिल भारतीय काँग्रेस पक्षातून झाली. त्यांनी काँग्रेस पक्षांतर्गत शेतकरी कामकरी संघ स्थापन केला. पुढे त्यातून स्वतंत्र पक्ष स्थापन झाला. पुढील काळात जेधे शेतकरी कामगार पक्षातून पुन्हा काँग्रेसमध्ये परतले. जेधे यानी संयुक्त महाराष्ट्र व गोवा मुक्ती चळवळीतसुद्धा योगदान दिले. थोडक्यात स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्योत्तर काळात केशवराव जेधे यांनी अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. त्यांच्या या कार्याचा अभ्यास प्रस्तुत 'केशवराव जेधे यांचे राजकीय विचार व कार्य' या शोधनिबंधात केला आहे.

**कीवर्ड: राजकीय विचार, स्वातंत्र्य, नेतृत्व, चळवळ, कामगार कल्याण.**

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये:**

१. केशवराव जेधे यांचे राजकीय विचार व कार्याचा चिकित्सक अभ्यास करणे.

२. केशवराव जेधे यांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान अभ्यासणे.

३. केशवराव जेधे यांचे शेतकरी व कामगार विषयक कार्य अभ्यासणे.

**संशोधन विषयाची व्याप्ती:**

प्रस्तुत विषयावर संशोधन करताना केशवराव जेधे यांचे राजकीय नेतृत्व, राजकीय विचार आणि कार्य अभ्यासणे, इतपत मर्यादित व्याप्ती ठेवली आहे. कालखंडाचा विचार करता केशवराव जेधे यांचा १८९६ मध्ये जन्म व १९५९ मध्ये मृत्यू झाला. त्यामुळे प्रस्तुत संशोधनासाठी १८९६ ते १९५९ ही कालमर्यादा घालून घेतली आहे.

**संशोधन पद्धती व माहिती संकलन:**

प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी ऐतिहासिक व ग्रंथालयीन संशोधन पद्धती वापरली आहे. केशवराव जेधे यांचे राजकीय नेतृत्व आणि समग्र विचारांचा व कार्याचा अभ्यास करताना प्राथमिक व दुय्यम साधनांच्या माध्यमातून माहितीचे संकलन केले. जेधे यांच्या कालखंडातील ऐतिहासिक व राजकीय स्वरूपातील तथ्यांचे संकलन करून माहितीचे विश्लेषण केले. माहितीच्या विश्लेषणासाठी प्राथमिक व दुय्यम साधने आणि तत्कालीन साकलिक माहिती यांचा आधार घेतला. केशवराव जेधे यांनी केलेले लेखन, त्यांची विविध भाषणे, त्यांनी दिलेली व्याख्याने, संविधान सभेतील कागदपत्रे, संयुक्त महाराष्ट्र चळवळीत जेधे यांनी मांडलेले ठराव व त्यासंबंधीची कागदपत्रे आणि केशवराव जेधे यांचे चरित्र या प्राथमिक साधनांद्वारे तर केशवराव जेधे यांच्या विचार व कार्यावर विविध लेखकांनी लिहिलेले ग्रंथ, पुस्तके, दैनिक वर्तमानपत्रातील लेख व नियतकालिके आणि मासिकांमधून प्रसिद्ध झालेले विविध लेख तसेच केशवराव जेधे यांच्या कार्यपद्धतीविषयी विविध विचारवंतांनी, अभ्यासकांनी दिलेली व्याख्याने, भाषणे या दुय्यम साधनांद्वारे माहिती संकलन केले आहे.

**केशवराव जेधे एक बहुआयामी नेतृत्व:**

केशवराव जेधे हे बहुआयामी नेतृत्व होते. त्यांचे सामाजिक कार्य अमुल्य आहे. तर त्यांनी ब्राम्हणेतर चळवळीत, भारतीय स्वातंत्र्य चळवळीत, संयुक्त महाराष्ट्र चळवळीत व गोवा मुक्ती चळवळीतसुद्धा मोलाचे योगदान दिले आहे. जेधे यांच्या पुढाकाराने डिसेंबर १९२० मध्ये ब्राह्मणेतर लीगची स्थापना करण्यात झाली. पुढे जेधे यांनी सविनय कायदेभंगाच्या चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. १० एप्रिल ते १६ एप्रिल १९३० या कालावधीत महर्षी वि. रा. शिंदे यांच्याबरोबर त्यांनी पुणे येथील २६ गावांमध्ये पायी फिरून मिठाचा सत्याग्रह केला. १२ नोव्हेंबर १९३० रोजी जेधे यांनी गोलमेज परिषदेवर बहिष्कार टाकून पुणे येथे एका सभेचे आयोजन केले. त्यांच्या या कृतीमुळे त्यांना ३ महिन्याची सक्तमजुरीची शिक्षा सुनावण्यात झाली. त्यानंतर जेधे १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाले. "१ डिसेंबर १९४० रोजी जेधे यांनी सासवड येथे सत्याग्रह केला. त्यात जेधेना दीड वर्षाची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांनी १९४२ च्या चले जाव चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. परिणामी त्यांना पुन्हा नाशिकच्या तुरुंगात हलवण्यात आले. पुढे

फेब्रुवारी १९४४ मध्ये त्यांची सुटका झाली."१ थोडक्यात सामाजिक व राजकीय अश्या दोन्ही पातळीवर जेधे यांनी कार्य केले आहे.

**केशवराव जेधे यांचे राजकीय विचार व कार्य:**

केशवराव जेधे यांच्या राजकीय विचार व कार्याचा अभ्यास करताना प्रामुख्याने त्यात जेधे यांनी शेतकरी कामगार पक्ष, काँग्रेस पक्ष व महाराष्ट्र निर्मितीसाठी निर्माण झालेल्या संघटनाच्या माधमातून केलेल्या कार्याचा समावेश केला आहे.

**i) शेतकरी व कामगार कल्याणाविषयीचे कार्य:**

केशवराव जेधे यांची शेतकरी व कामगार कल्याणाविषयी भूमिका स्पष्ट होती. त्यांनी शेतकरी व कामगार वर्गासाठी विविध आंदोलने उभारली. उदा. २५ जुलै १९२५ रोजी मुंबई प्रांतात शेतकरी परिषदेचे आयोजन. या परिषदेत जेधे यांनी सारा विधेयक व जमीन विभागणी बंदीच्या विधेयकाविरोधात ठराव मांडले. ब्रिटिश सरकार शेतकऱ्यांचे कशा पद्धतीने शोषण करते ? हे दाखवून देण्याचे काम या परिषदेच्या माध्यमातून केले. तर काँग्रेसमध्ये झालेल्या मतभेदावरून केशवराव जेधे यांनी सप्टेबर १९४६ मध्ये शेतकरी कामकरी संघाची स्थापना केली. पुढे केशवराव जेधे यांनी मोरे यांच्या सहकार्याने १३ जून १९४८ रोजी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली.

शेतकरी कामगार पक्षाचे दुसरे अधिवेशन २९ मे १९५० रोजी केशवराव जेधे यांच्या अध्यक्षतेखाली नाशिक जिल्ह्यातील दाभाडी येथे भरले. या अधिवेशनात केशवराव जेधे यांनी प्रथम सत्यशोधक चळवळीत नंतर ब्राह्मणेतर चळवळीत व पक्षात आपण का होतो ? त्यानंतर काँग्रेसमध्ये का गेलो ? आणि १९४८ साली काँग्रेस सोडून शेतकरी कामगार पक्ष का स्थापन केला? याविषयीचे विवेचन केले. महात्मा गांधींच्या खुणानंतरच्या जाळपोळीचे खापर केशवराव जेधे व त्यांचे सहकारी आणि विशेषता: मराठा जातीवर फोडण्यात येऊ लागल्यावर केशवराव जेधे यांनी ७ मार्च १९४८ रोजी मुंबई येथे महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसची एक खास बैठक बोलावली. तत्पूर्वी ६ मार्चला काँग्रेस कार्यकारिणीच्या सभेत शंकरराव देव यांनी ही दंगल जातीय भूमिकेवरून करण्यात आली असा निष्कर्ष सांगितला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघात व हिंदू महासभेत असलेल्या ब्राह्मणेतरांना दंगलीची झळ लागल्याची वस्तुस्थिती केशवरावांनी देव गटाच्या निदर्शनास आणली. त्यावेळी ७ मार्चच्या प्रांतिक काँग्रेसच्या सर्वसाधारण सभेत खालील ठराव एकमताने मंजूर झाला. "या अत्याचाराचे मूळ सामान्य जनतेचे गांधींवरील प्रेम व भक्ती जशी आहे, त्याचप्रमाणे समाजातील गुंड व गुन्हेगार वृत्ती, दीर्घकालीन सामाजिक, धार्मिक व आर्थिक विषमतेची चीड ही आहेत. म्हणून गेल्या आठवड्यात महाराष्ट्रातील निरनिराळ्या वर्तमानपत्रातून झालेल्या घटनेची जी मिमांसा करण्यात येत आहे, ती बरोबर नसून झालेल्या घटनेत ब्राह्मण - ब्राह्मणेतर वाद होता हे म्हणणे बरोबर नाही."२ या अधिवेशनात वरील ठराव एकमताने पारित झाला. त्याचे कारण असेही सांगता येते की, जेधे गट काँग्रेसमधून बाहेर पडण्याच्या मार्गावर होता. शिवाय प्रांतिक काँग्रेसमध्ये जेधे

गटाचे बहुमत होते. परिणामी पुढे जेधे व मोरे यांच्यात तात्विक मतभेद सुरू झाले.

१७ मे १९५२ रोजी केशवराव जेधे यांनी शेकापचा राजीनामा देणारे पत्र पक्षाकडे पाठवले. परंतु त्यावेळी झालेल्या चर्चेनंतर केशवराव जेधे यांनी आपला राजीनामा मागे घेतला. परंतु पुढील दोन वर्षात हा वाद जास्त वाढल्याने १५ ऑगस्ट १९५४ रोजी केशवराव जेधे यांनी पुन्हा काँग्रेसमध्ये प्रवेश केला. ३ फेब्रुवारी १९५६ रोजी टिळक स्मारक येथे झालेल्या सभेत केशवराव जेधे असे म्हणाले की, काँग्रेसमध्ये राहूनसुद्धा मला संयुक्त महाराष्ट्राबाबत भूमिका घेण्याचा अधिकार आहे. संयुक्त महाराष्ट्रासाठी पक्ष शिस्त न पाळल्याबद्दल काँग्रेस पक्षाने मला पक्षातून काढून टाकले तरी चालेल.३ थोडक्यात केशवराव जेधे यांना पक्षापेक्षा महाराष्ट्र निर्माण होणे अत्यंत महत्त्वाचे वाटत होते.

**ii) राजकीय सत्ता व कार्य:**

केशवराव जेधे यांचे नेतृत्व सामाजिक चळवळीतून पुढे आले होते. ब्राह्मणेतर चळवळ व समाज सुधारणेचे केलेले कार्य यातून केशवराव यांचे नेतृत्व आकाराला आले होते. गांधीजींच्या प्रभावाने केशवराव जेधे सत्याग्रही चळवळीत सामील झाले. पुढे केशवरांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला व खऱ्या अर्थाने त्यांच्या राजकीय कार्याला सुरुवात झाली. "११ डिसेंबर १९३७ रोजी एक पत्र काढून सेनापती बापट यांनी काँग्रेस नेत्यांना आवाहन केले".३ त्यात असे म्हटले होते की, "थोडे दिवसापूर्वी महात्मा फुले यांच्या जयंतीच्या दिवशी शनिवार वाड्यापुढच्या सभेत जे मी बोललो होतो त्यात डॉ. आंबेडकर यांना कोणत्याही अटी न घालता प्रांताच्या प्रधान मंडळात स्थान दिले पाहिजे व केशवराव जेधे यांना महाराष्ट्राने आपल्या प्रांतिक कमिटीच्या अध्यक्षपदी निवडावे. तुरुंगातून बाहेर आल्यावर मला असे समजले की, गेल्या सात वर्षाच्या प्रचंड उलाढालित देशभक्त केशवराव जेधे यांनी धडाडीचे काम केले आहे. यापुढे काँग्रेसचे काम खेड्यापाड्यात नेऊन दृढमूल करावयाचे आहे. त्या कामात देशभक्त केशवराव जेधे यांचे नेतृत्व अतिशय उपयोगी पडेल. तर देशभक्त अण्णासाहेब शिंदे यांनी १९३० साली येरवड्याचा रस्ता धरला. त्यावेळी गायीमागे वासरू जाते, त्याप्रमाणे देशभक्त केशवराव जेधे त्यांच्या मागे गेले."४ यावरून केशवराव जेधे यांच्या कार्याची व नेतृत्वाची कामगिरी दिसून येते. या कामगिरीच्या जोरावर "१५ जानेवारी १९३८ रोजी सांताक्रुज येथे 'महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस समिती'ची सभा पार पडली होती. या सभेत केशवराव जेधे यांची प्रांताध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली."५ शंकरराव देव यांच्या मते, केशवराव जेधे यांनी महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष स्थान स्वीकारावे अशी सूचना जेव्हा माझ्याकडे आली तेव्हा मी त्याचा विचार केला नव्हता. परंतु वर्तमानपत्रातील आलेल्या बातम्यामुळे देव यांनी जेधे यांची भेट घेतली. त्यांच्यात झालेल्या चर्चेनंतर केशवराव जेधे यांना शंकरराव देव यांनी अध्यक्ष होण्यासाठी सांगितले. शंकरराव देव यांच्या मते, "केशवराव जेधे हे सामान्य जनतेच्या संघटनेचा महाराष्ट्रात खोल पाया घालतील असा मला विश्वास आहे"६ यावरून असे दिसते की, केशवराव जेधे यांचे नेतृत्व जनसामान्यांपर्यंत पोहोचले होते. जनसामान्यांना

काँग्रेसमध्ये समाविष्ट करून घेण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न मोलाचे होते.

अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर केशवराव जेधे यांचा २२ जानेवारी १९३८ रोजी पुणे येथे सत्कार समारंभ पार पडला. या समारंभात त्यांनी असे मत व्यक्त केले की, "खालचा दडपलेला वर्ग वर यावा शेतकरी व कामकरी यांची पिळवणूक थांबावी या मताचा मी आहे मी आज जरी समाज सत्तावादी पक्षाचा सभासद नसलो तरी माझी मते त्यांच्याशी मिळतीजुळती आहेत माझा समाज खेड्यात आहे व तोच खरा राष्ट्राचा पाया आहे".७ केशवराव जेधे यांच्या या भूमिकेवरून असा आशय व्यक्त होतो कि, सर्वसामान्य जनतेचे मत लक्षात घेऊन राष्ट्र उभारणी केली जावी. जेधे यांच्या मते, माझा समाज खेड्यात आहे. म्हणजे शेतकरी व कामगार हे बहुसंख्येने ग्रामीण भागात राहतात ग्रामीण भागाचा विकास म्हणजे राष्ट्राचा विकास होय. केशवराव जेधे यांनी काँग्रेस खेड्यापाड्यात पोहोचवल्यामुळे महाराष्ट्रातील ११ लोकल बोर्डापैकी १० लोकल बोर्डामध्ये काँग्रेसला सत्ता मिळाली. तर पुणे जिल्हा लोकल बोर्डातील ५० जागांपैकी ३६ जागा काँग्रेसने जिंकल्या. अशाप्रकारे जेधे काँग्रेसचे प्रांताध्यक्ष झाल्यानंतर काँग्रेसला प्रचंड यश मिळाले. थोडक्यात केशवराव जेधे यांचे नेतृत्व व संघटन कौशल्य या ठिकाणी कामी आल्याचे दिसते.

१९५२ नंतर काँग्रेस पक्ष शेतकरी व कामगार यांचे कल्याण करण्यात अपयशी ठरत आहे असे केशवराव जेधे यांना वाटू लागले. त्यातूनच जेधे यांनी "२४ एप्रिल १९५४ रोजी आपला राजीनामा सरचिटणीस खाडिलकर यांच्याकडे पाठवून दिला". जेधे यांनी काँग्रेस सोडल्यानंतर त्यांनी परत काँग्रेसमध्ये येण्यासाठी अनेक कार्यकर्त्यांनी जेधे मॅन्शनवर मोर्चा काढला. या मोर्चाला केशवराव जेधेनी प्रत्युत्तर देताना असे म्हटले की, "आज ज्यांच्या हातात काँग्रेसची सत्ता किंवा सूत्रे आहेत त्यापैकी मोर्चात कोणीही दिसत नाही. ते आपल्या सत्तेवरून खाली उतरून माझ्याकडे यायला तयार नाहीत. मीही स्वाभिमानी माणूस आहे. श्री. तुळशीराम जाधव यांनी मला विनंती करून पुन्हा पक्षात येण्यास सांगितले आहे, पण मी असंगाशी संग केला, ती चूक पुन्हा करणार नाही. प्रजा समाजवादी व संघाच्या लोकांनी मला पाचारण केले आहे, पण मी कुठेच जाणार नाही. कम्युनिस्ट तर देशद्रोही असल्याने मी तिकडे जाणार नाही. मी सध्य परिस्थितीचा विचार करीत असून १५ ऑगस्टला मी कुठे जायचे याचा निर्णय घेईन."८ थोडक्यात केशवराव जेधे यांच्या मते, ज्या बहुजनांना मी काँग्रेसमध्ये आणले ते बहुजन मला पुन्हा काँग्रेसमध्ये येण्याची विनवणी करीत आहेत. परंतु काँग्रेसमधील राजकीय नेतृत्व सन्मानाने मला बोलविण्यास उत्सुक नाही.

केशवराव जेधे काकासाहेब गाडगीळ यांच्याबरोबर सासवडच्या शंकरराव देव यांच्या आश्रमात गेले. तिथे प्रेमाताई कंटक यांच्याशी बोलताना केशवराव म्हणाले की, "सार्वजनिक जीवनाच्या नाटकातील पहिल्या अंकात सामाजिक अन्यायाविरुद्ध भांडलो, दुसऱ्या अंकात काकासाहेबांच्या बरोबर स्वातंत्र्यासाठी भांडलो. आता काँग्रेसला सोडल्यानंतर तिसरा अंक शोकांतिका ठरला आहे. मित्र कोण शत्रू कोण कळत

नाही."९ यावेळी काकासाहेब गाडगीळ यांनी केशवराव जेधेंशी महत्वपूर्ण चर्चा केली. १५ ऑगस्ट १९५४ रोजी केशवराव जेधेंनी पुन्हा काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यावेळी जेधे असे म्हणाले की, "मूर्खांच्या पुढाऱ्यांपेक्षा शहाण्यांचे अनुयायी होणे बरे ! म्हणून पंडित जवाहरलाल नेहरूंच्या मागे जाण्यातच देशहित आहे अशी आपली खात्री पटली आहे".१० थोडक्यात काँग्रेसशिवाय तरणोपाय नाही हे केशवराव जेधे यांनी ओळखले होते. खऱ्या अर्थाने ग्रामीण भागाचा विकास करावयाचा असल्यास शेतकरी व कामगार कल्याणची धोरणे राबवायची असल्यास काँग्रेस हे एकमेव माध्यम आहे, असे जेधे यांना वाटले असावे.

**निष्कर्ष:**

१. केशवराव जेधेनी बहुजन समाजाला राजकीय प्रक्रियेत प्रतिनिधीत्व मिळवण्यासाठी विशेष प्रयत्न केले.
२. राजकीय पक्ष व जनतेच्या विकासासाठी कल्याणकारी धोरणे राबविणे यापैकी जेधेनी जनतेच्या विकासाला अग्रस्थान दिले.
३. केशवराव जेधे यांनी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात काँग्रेसचा विस्तार केला.
४. शेतकरी कामगार पक्षातील नेतृत्व स्पर्धेमुळे केशवराव जेधे यांनी पक्षत्याग केला.
५. थोडक्यात असे म्हणता येते की, आजच्या संदर्भात केशवराव जेधे यांचे विचार व कार्य हे राजकीय नेतृत्व व जनता यांना मार्गदर्शक ठरते.

**संदर्भ ग्रंथ सूची:**

१. गाडगीळ. न. वि., पथिक, भाग दुसरा, १९६५, पृष्ठ क्र. ३२.
२. शेतकरी कामगार पक्ष, (२९ मे १९५०), 'अधिवेशन दुसरे, दाभाडी, नाशिक, श्री. केशवराव जेधे यांचे अध्यक्षीय भाषण', पृष्ठ क्र. २८.
३. फडके य. दि., (१९९३), 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र', खंड – ४, श्री विद्या प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. १५९.
४. बापट वामनराव, सुतार द. म. आणि तुळपुले वसंत (संपादक), (१९८८), 'सेनापती बापट वाडमय - समग्र ग्रंथ', खंड – ४ , पृष्ठ क्र. २८१.
५. फडके य. दि., (१९८२), केशवराव जेधे चरित्र, श्री विद्या प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. १६१.
६. उपरोक्त, पृष्ठ क्र. १६१.
७. नवाकाळ, १३ जुलै १९३७.
८. फडके य. दि., (१९९३), विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड – ६, श्री विद्या प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. २२४.
९. फडके य. दि., (१९९३), 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र', खंड – ४, श्री विद्या प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. २२५.
१०. उपरोक्त, पृष्ठ क्र. २२५.